# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १८४ | शनिवार, २४ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### प्रेमाच्या जाळ्यात ओढून तरुणीची ९२ हजारांची फसवणूक

**पुणे, ता. २३ :** सोशल मीडियावरील ओळखीचा गैरफायदा घेत आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार आंबेठाण परिसरात उघडकीस आला आहे. फेसबुकवरून मैत्री वाढवून, त्यानंतर प्रेमसंबंध व विश्वास संपादन करत एका तरुणीची तब्बल ९२ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी २५ वर्षीय तरुणीने म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यानुसार संबंधित तरुणाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही घटना १३ डिसेंबर २०२५ रोजी आंबेठाण परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फेसबुकच्या माध्यमातून तरुणीशी ओळख वाढवली. सुरुवातीला मैत्री, त्यानंतर नियमित संवादातून भावनिक जवळीक निर्माण करत त्याने प्रेमसंबंध प्रस्थापित केले. काही कालावधीनंतर आरोपीने आपल्या बहिणीचे लग्न असल्याचे कारण पुढे करत आर्थिक अडचण असल्याचे सांगितले व मदतीची मागणी केली.

# ‘यशवंत’ कारखाना १५ वर्षांनंतर बँकेच्या ‘कस्टडी’तून सभासदांच्या ताब्यात

## २१ हजार सभासदांसाठी ऐतिहासिक दिवस; संचालक मंडळांच्या प्रयत्नांना यश

**लोणी काळभोर, ता. २३ :** हवेलीचे वैभव असलेल्या थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखाकारखाना तब्बल १५ वर्षांच्या कालावधीनंतर बँकेच्या कस्टडीतून मुक्त होऊन सभासदांच्या ताब्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ अखेर थकीत असलेले ५४ कोटी ८५ लाख रुपयांचे कर्ज, एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत ३६ कोटी ५० लाख रुपयांमध्ये सेटल करून ३० सप्टेंबर २०२५ रोजी भरणा करून फेडण्यात आले. अशी माहिती यशवंत कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप यांनी दिली.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष किशोर उंद्रे, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक कैलास जरे तसेच पंच बळीराम गावडे, संजय भोरडे यांच्या उपस्थितीत रीतसर कारखान्याचा ताबा कारखाना व्यवस्थापनाकडे सुपूर्द करण्यात आला. तसेच राज्यातील बँकेच्या कस्टडीतून बाहेर पडलेला





हा कदाचित एकमेव सहकारी साखर कारखाना असल्याचे मतही यावेळी अध्यक्ष जगताप यांनी व्यक्त केले.

यापुढे बोलताना जगताप म्हणाले, सन २०१०-११च्या गळीत हंगामापासून बंद असलेला हा कारखाना खऱ्या अर्थाने आता सभासद शेतकऱ्यांच्या ताब्यात आला असून, कारखाना पूर्ववत सुरू होईलही बाब सहकार क्षेत्रासाठी ऐतिहासिक यश मानली जात आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रामाणिक प्रयत्न आणि आर्थिक शिस्तीमुळे हे यश संपादन झाले. कारखान्याच्या संचालक मंडळाने सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम कारखान्याच्या परिसरातील अडचणी सोडवण्यावर भर देण्यात आला. योग्य नियोजन आणि काटेकोर आर्थिक व्यवस्थापनामुळे तब्बल ८५ लाख रुपयांची बचत करण्यात यश आले.

२०११ पासून अनेक शेतकऱ्यांचे ऊस बिल, कामगारांचे वेतन तसेच बँकांची देणी प्रलंबित होती. मात्र संचालक मंडळाने सभासद, कामगार आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने ही देणी फेडण्याचे धोरण स्वीकारले. काही वेळा आर्थिक अडचणी असतानाही संचालक मंडळाने थेट सभासदांकडून निधी उभारून कामगारांचे पगार व आवश्यक खर्च भागवले.

या संपूर्ण प्रक्रियेत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, उपसभापती शशिकांत गायकवाड, शिवाजीराव घुले यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कारखान्यावर असलेले सुमारे ५४ कोटी रुपयांचे ओझे कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.

दरम्यान, शेतकरी, कामगार व शासकीय देणी अदा करून नवीन अत्याधुनिक साखर प्रकल्प, डिस्टिलरी प्रकल्प व सहवीजनिर्मिती प्रकल्प सुरू करून हवेली तालुक्यातील एकमेव श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याला पुन्हा वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार यावेळी संचालक मंडळ व सभासदांनी व्यक्त केला.

या बँकेची होती कर्ज बँक ऑफ इंडिया, थेऊर येथील १ कोटी ३० लाख ६९ हजार ३१६, स्टेट बँक ऑफ इंडिया, उरुळी कांचन येथील ७ कोटी १० लाख ६७ हजार ३०० तसेच बँक ऑफ बरोडा, कुंजीरवाडी येथील ३ कोटी ७५ लाख इतकी थकीत कर्जे होती. एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी भरून कारखाना सर्व बँकांच्या कर्जातून मुक्त करण्यात आला आहे.

### २१ हजार सभासदांसाठी ऐतिहासिक दिवस : उपाध्यक्ष किशोर उंद्रे

सद्याच्या संचालक मंडळाला सुमारे दोन वर्षांचा कालावधी पूर्ण होत असताना, आज प्रत्यक्ष आपल्या मालकीच्या कारखान्यात बसण्याचा आनंद वेगळाच आहे. कारखाना आज खऱ्या अर्थाने २१ हजार सभासदांच्या मालकीचा झाला आहे. त्यामुळे सभासद शेतकरी बांधवांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आणि आनंदाचा ठरला आहे. याशिवाय कृषी उत्पन्न बाजार समितीने कारखान्यासोबत ९९.२७ एकर जमिनीचा व्यवहार केल्याने कारखान्याच्या आर्थिक पुनरुज्जीवनाला मोठा हातभार लागला. या संपूर्ण प्रक्रियेत हवेली तालुक्याचे नेतृत्व, बाजार समितीचे पदाधिकारी आणि संचालक मंडळाने एकत्रितपणे निर्णायक भूमिका बजावली. आज कारखाना पूर्णपणे सभासदांच्या मालकीचा झाल्याने हवेली तालुक्यातील शेतकरी, कामगार व सहकार क्षेत्रात नव्या आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील काळात कारखाना पूर्ववत सुरु करून आधुनिक प्रकल्पांच्या माध्यमातून पुन्हा वैभवशाली करण्याचा निर्धार यावेळी उंद्रे यांनी व्यक्त केला आहे.

# बजाज पुणे ग्रँड टूरने रचला आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेतला नवा इतिहास

## अंतिम टप्प्यात आंतरराष्ट्रीय सायकलिस्टचे १४ लाख पुणेकरांकडून दुतर्फा स्वागत

**पुणे, ता. २३ :** पुणे ग्रँड टूर२०२६ या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा आज अंतिम टप्पा पूर्ण होताच ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. उत्कृष्ट नियोजन, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि पुणे व पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या उत्स्फुर्त सहभागामुळे ही स्पर्धा देश-विदेशातील क्रीडाप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरली.

या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण भारत व भारतीय उपखंडात स्टार स्पोर्ट्स आणि जिओ हॉटस्टारवर, तर युरोपसह जगातील ७० हून अधिक देशांमध्ये एचबीओ मॅक्स आणि डिस्कवरी प्लस या आंतरराष्ट्रीय माध्यमांद्वारे करण्यात आले. या जागतिक थेट प्रक्षेपणातून पुणे जिल्ह्यातील पर्यटनस्थळे, विस्तीर्ण व सुशोभित रस्ते, ऐतिहासिक वास्तू, सांस्कृतिक वारसा, मराठी नाटक व संगीत परंपरा, क्रीडा संस्कृती, पर्यावरणपूरक उपक्रम आणि आधुनिक पायाभूत सुविधांचे प्रभावी दर्शन जगभरातील प्रेक्षकांना घडले.


आज दुपारी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगेबालेवाडी येथून सुरू झालेला अंतिम टप्पा पाषाण, एनसीएल मैदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक, राजीव गांधी पूल, रक्षक चौक, काळेवाडी, डांगे चौक, संत तुकाराम महाराज पूल, स्वामी विवेकानंद चौक, भक्ती-शक्ती चौक, त्रिवेणी नगर, पीसीएनटीडीए, स्पाईन रोड, नळस्टॉप, लक्ष्मीनारायण चौक, सेव्हन लव्हज चौक, टर्फ क्लब, नॅशनल वॉर मेमोरियल, साधू वासवानी चौक, शनिवारवाडा, साखर संकुल, एफ.सी. रोड आणि जंगली महाराज रोड मार्गे बालगंधर्व रंगमंदिर येथे समारोपाला पोहोचला.

या अंतिम टप्प्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांतील नागरिकांनी तब्बल ९९.१५ किलो मीटरच्या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा उभे राहत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकलपटूंना उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सुमारे १४ लाख नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून खेळाडूंना केलेले स्वागत हे जागतिक सायकल स्पर्धांच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले असून, नागरिकांच्या सहभागाच्या दृष्टीने नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे.

स्पर्धा मार्गावरील चौकांचे सुशोभीकरण, स्वच्छता, नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्था, हरित पट्ट्यांची सजावट, एलईडी स्क्रीन, सांस्कृतिक सादरीकरणे आणि नागरिकांचा उत्साही सहभाग यामुळे पुणे शहराचे सौंदर्य थेट प्रक्षेपणातून जगभर पोहोचले. समालोचकांनी पुण्याचा इतिहास, सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक वाटचाल ओघवत्या शैलीत मांडली. ऐतिहासिक शनिवारवाडा, मराठी सांस्कृतिक ओळख जपणारे बालगंधर्व रंगमंदिर, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, लाल महाल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जंगली महाराज रोडवरील पाताळेश्वर मंदिर आदी स्थळांची माहिती स्पर्धेदरम्यान देण्यात आल्याने पुण्याचा वारसा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम जागतिक व्यासपीठावर अधोरेखित झाला.

# ‘महाराष्ट्र सदन’ प्रकरणात छगन भुजबळांना ईडीकडून क्लीन चीट

**मुंबई, ता. २३ :** महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळ चर्चेत राहिलेल्या छगन भुजबळ यांच्यासाठी आजचा दिवस निर्णायक ठरला. कथित महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने त्यांना दिलेली क्लिनचीट म्हणजे जवळपास दहा वर्षे चाललेल्या कायदेशीर संघर्षाचा शेवट आहे. आधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आणि आता ईडीनेही आरोप सिद्ध न झाल्याचे मान्य केल्याने भुजबळ पूर्णपणे निर्दोष ठरले आहेत.



**प्रकरणाची पार्श्वभूमी काय होती?**

दिल्लीतील महाराष्ट्र सदनाच्या पुनर्बांधणीदरम्यान सुमारे ८५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप छगन भुजबळ यांच्यावर ठेवण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी नियमबाह्य कंत्राटे दिली, असा दावा तपास यंत्रणांकडून करण्यात आला. या आरोपांमुळे भुजबळांना २०१६ ते २०१८ दरम्यान जवळपास दोन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. या प्रकरणात एकूण १४ जण आरोपी होते.

**आता नेमकं काय बदललं?**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने काही काळापूर्वीच मुख्य गुन्हाच सिद्ध होत नाही असा निष्कर्ष काढत भुजबळांना दोषमुक्त केले. त्यानंतर मनी लॉन्डरिंगचा आधार घेऊन सुरू असलेला ईडीचा खटला देखील कमकुवत ठरला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा गुन्हा टिकत नसल्याने ईडीकडेही स्वतंत्र पुरावे नसल्याचे न्यायालयाने मान्य केले आणि ईडीचा खटला रद्द केला.

**याचे राजकीय महत्त्व काय?**

ही क्लिनचीट म्हणजे भुजबळ यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेसाठीच नव्हे, तर अजित पवार गटासाठीही मोठा दिलासा आहे. निवडणुकांच्या तोंडावर भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून होणाऱ्या हल्ल्यांना उत्तर देण्यासाठी सत्ताधारी महायुतीला आता ठोस मुद्दा मिळाला आहे. दीर्घकाळ आरोपी अशी ओळख लावली गेलेले भुजबळ आता कायदेशीरदृष्ट्या मोकळे झाले असून, त्यांच्या राजकीय पुनरागमनाचा मार्गही अधिक स्पष्ट झाला आहे.

# ...अखेर प्रशांत गवळीला आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक; पोलिसांच्या कारवाईवर नागरिकांकडून समाधान

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. २३ : शेतकऱ्यांच्या माल इम्पोर्ट एक्स्पोर्ट करण्याच्या नावाखाली व प्रतिमाह १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून पुणे, सोलापूरसह राज्यातील हजारो गुंतवणूकदारांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घालणाऱ्या हडपसर (पुणे) येथील समर्थ क्रॉप केअर कंपनीचे मालक प्रशांत गवळीला पुणे शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुरुवारी (ता. २२) अटक केली आहे.

प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांनी गुंतवणूकदारांना वेगवेगळी आमिषे दाखवून कोट्यावधी रुपयांची माया बेकायदा गोळा केली आहे. आपले भिंग कधीही फुटणार म्हणून मागील पाच महिन्यांपासून गुंतवणूकदारांना परतावा देणे बंद करण्यात आले होते. गुंतवणूकदारांनी मुद्दल मागण्याचा तगादा लावल्यानंतर त्यांना धमकी देण्यात येत होती. परंतु, या धमक्यांना न घाबरता काही गुंतवणूकदारांनी थेट पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

याप्रकरणी लक्ष्मी विजय बर्लाल (वय ६१,रा. १४७ सोमवार पेठ, त्रिशुंढ गणपती समोर, आत्रे वाडा, पुणे) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांवर हडपसर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), ३१६ (५), ३ (५), ६१ (२) व महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियमन १९९९ चे कलम ३ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुणे आर्थिक गुन्हे शाखेने प्रशांत गवळीला त्वरित अटक केली आहे.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त अमितेशकुमार गुप्ता, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उप-आयुक्त (आर्थिक व सायबर गुन्हे) विवेक मासाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त




शुभदा संखे यांच्या मार्गदर्शनाखाली , आर्थिक व सायबर युनिट ५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस, सहायक पोलीस निरीक्षक अर्चना गायकवाड, पोलीस उप निरीक्षक राजु गायकवाड, सहायक फौजदार सुजाता ढोणे, पोलीस हवालदार स्वाती खंडाळे व त्यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्चना गायकवाड करत आहेत.

**प्रशांत गवळीला अटक केल्याने समाधान**

आर्थिक गुन्हे शाखेने बहुचर्चित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य आरोपी प्रशांत गवळीला अटक केल्याने हजारो गुंतवणूकदारांनी समाधान व्यक्त केले आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या या फसवणूक प्रकरणात अखेर कारवाई झाल्याने आरोपींना शिक्षा होईल, अशी अपेक्षा गुंतवणूकदारांमध्ये निमर्ाण झाली आहे. मात्र, अटक झाली तरी आपली गुंतवणूक सुरक्षित आहे का, हा मोठा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

**गुंतवणुकीचे काय होणार?**

प्राथमिक माहितीनुसार हा आर्थिक घोटाळा तब्बल ४ ते ५ हजार कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात ४० हजारांहून अधिक गुंतवणूकदार अडकले असून अनेकांनी आयुष्यभराची बचत, कर्ज काढून किंवा मालमत्ता विकून गुंतवणूक केल्याची माहिती समोर येत आहे. प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांनी आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे. आता आरोपी अटकेत असला तरी पैसे परत मिळणार की कायमचे बुडणार, याबाबत गुंतवणूकदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले असून मानसिक तणावात मोठी वाढ झाली आहे. दरम्यान, आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आरोपींची मालमत्ता, बँक खाती व व्यवहार तपासले जात आहेत. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तेतून गुंतवणूकदारांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मात्र प्रत्यक्षात किती रक्कम परत मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गुंतवणूकदारांना आर्थिक गुन्हे शाखेचे आवाहन

प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ५ टक्के नफा व ५ टक्के मुद्दल रक्कम अशा प्रकारे एकुण १० टक्के परतावा देण्याचे आमीष दाखवुन अनेक गुंतवणुकदारांना मुळ रक्कम तसेच परतावा दिले नाही. अनेक गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. फसवणुक झालेल्या गुंतवणूकदरांनी कागदपत्रे व पुराव्यांसह पुणे शहर आर्थिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात तपासकामी हजर रहावे. असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेकडून गुंतवणुकदारांना करण्यात आले आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### शेतात मोटार सुरु करण्यावरून झालेल्या वादात सासऱ्याने केली सुनेला मारहाण

**नाशिक, ता. २३ :** नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातल्या ममदापूर गावात कौटुंबिक वादातून घडलेली एक संतापजनक घटना सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. पाण्याची मोटर सुरू करण्यासारख्या किरकोळ कारणावरून सासऱ्याने आपल्या सुनेवर काठीने बेदम मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे.ममदापूर येथील रहिवासी बबन किसन गुडघे आणि त्यांची सून मनीषा दत्तू गुडघे यांच्यात पाण्याच्या मोटरवरून वाद झाला. घरगुती वापरासाठी मोटर कधी सुरू करायची, यावरून सुरू झालेला हा वाद काही क्षणांतच हिंसक बनला. रागाच्या भरात बबन गुडघे यांनी हातातील काठीने मनीषा यांना मारहाण केली. ही मारहाण इतकी गंभीर होती की मनीषा यांना स्वतःचा बचाव करण्याचीही संधी मिळाली नाही. या संपूर्ण घटनेचा धक्कादायक व्हिडिओ मनीषा यांच्या अल्पवयीन मुलाने मोबाईलमध्ये चित्रीत केला. तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच नागरिकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. घरातच महिलांवर होणारी हिंसा अजून किती काळ सहन करायची? असा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. ग्रामीण भागात अजूनही महिलांना भोगाव्या लागणाऱ्या अत्याचारांचं हे विदारक उदाहरण असल्याचं मत व्यक्त केलं जात आहे. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने दखल घेतली. या प्रकरणी येवला तालुका पोलीस ठाणे येथे बबन किसन गुडघे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शस्त्राचा धाक दाखवून भररस्त्यात लावले गुगल पे करायला

**पुणे, ता. २३ :** विद्यानगरी आणि आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात गुन्हेगारीच्या नव्या आणि धक्कादायक पद्धती समोर येत आहेत. एका बाजूला रस्त्यावर चालणाऱ्या तरुणांना शस्त्राचा धाक दाखवून लुटले जात आहे. कोंढव्यातील कौसरबाग परिसरात एका २४ वर्षीय तरुणाला दोन दुचाकीस्वारांनी गाठले. चोरट्यांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवून तरुणाला जागीच ठार मारण्याची धमकी दिली. मौल्यवान वस्तू लुटल्यानंतरही त्यांचे समाधान झाले नाही; त्यांनी तरुणाला त्याचा मोबाईल अनलॉक करायला लावून हजार रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले. आतापर्यंत चोरटे फक्त रोख रक्कम चोरत असत, पण ऑनलाइन ट्रान्झॅक्शनचा वापर करून केलेली ही लूट अधिक धाडसी आहे. ज्या खात्यात पैसे गेले, त्याचा माग काढणे सोपे असले तरी, चोरट्यांनी दाखवलेली ही हिंमत पुणेकरांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

# पुणेकरांनी अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद दिला नाही; अजित पवारांची जाहीर नाराजी

## सायकल स्पर्धेच्या निमित्ताने 'दादां'नी सुनावले खडे बोल



**पुणे, ता. २३ :** आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा आज चौथा दिवस सुरू असतानाच या स्पर्धेच्या निमित्ताने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात सुरू असलेल्या घडामोडींवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट आणि काहीसे टोचणारे भाष्य केले. स्पर्धेच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त करताना त्यांनी आतापर्यंतचे नियोजन आणि अंमलबजावणी सकारात्मक असल्याचे सांगितले. ही स्पर्धा केवळ क्रीडास्पर्धा नाही, तर राज्याच्या क्षमतेचं आणि व्यवस्थापनाचं प्रदर्शन आहे. त्या दृष्टीने आम्ही चांगलं काम केलं आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असतानाच या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्घाटनासाठी उपस्थित राहिले, याचा उल्लेख करत अजित पवार यांनी प्रशासन आणि सरकारच्या प्राधान्यक्रमावर भर दिला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दौरे, बैठकांचा व्याप असूनही त्यांनी उद्घाटनासाठी वेळ काढला, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही, असं ते म्हणाले.

या स्पर्धेमुळे शहरातील नागरिकांनी दाखवलेल्या शिस्तीचंही त्यांनी कौतुक केलं. रस्त्यांवरील वाहतूक नियंत्रण, वेळेचं पालन आणि नियमांची अंमलबजावणी यामुळे स्पर्धा सुरळीत पार पडत असल्याचं त्यांनी नमूद केलं. त्याचबरोबर स्पर्धेच्या निमित्ताने झालेल्या रस्त्यांच्या कामांकडे लक्ष वेधत, रस्त्यांची गुणवत्ता सुधारली, संपूर्ण रूट अधिक सुरक्षित आणि दर्जेदार झाला, असं त्यांनी स्पष्ट केलं.

मात्र पुणेकरांच्या प्रतिसादाबाबत अजित पवारांनी थोडी नाराजी व्यक्त केली. आम्हाला पुणेकरांकडून अधिक उत्स्फुर्त प्रतिसाद अपेक्षित होता. तो अपेक्षेइतका मिळाला नाही, असं ते म्हणाले. तरीही या स्पर्धेमुळे पुणे आणि परिसरातील पायाभूत सुविधांना चालना मिळाल्याचं त्यांनी मान्य केलं.

दरम्यान, महापालिका महापौर आरक्षण सोडतीवरून होत असलेल्या आरोपांवर त्यांनी ठाम भूमिका घेतली. मी गेली वर्षे प्रशासनात काम करत आहे. आरक्षण सोडतीत काहीही गैर झालं, असं मला वाटत नाही. कुणाकडे ठोस पुरावे असतील, तर त्यांनी ते समोर आणावेत, असं त्यांनी सांगितलं.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र निवडणूक लढवणार का, या प्रश्नावर मात्र त्यांनी थेट उत्तर टाळलं. बघू आता, एवढकंच म्हणत त्यांनी राजकीय चर्चांना पुन्हा एकदा खाद्य दिलं. सायकल स्पर्धेच्या निमित्ताने विकास, शिस्त, प्रशासन आणि राजकारण या सगळ्याच मुद्द्यांवर अजित पवारांच्या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

### शाळेच्या व्हॅनमध्ये ४ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

**बदलापूर, ता. २३ :** बदलापूर शहरात पुन्हा एक संतापजनक घटना घडली आहे. येथे शाळेतून घरी परतणाऱ्या एका ४ वर्षीय विद्यार्थिनीवर स्कूल व्हॅन चालकाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बदलापूर पश्चिम पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी चालकाला बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी शाळेत शिकते. दररोज दुपारी १२:३० वाजेपर्यंत ती स्कूल व्हॅनने घरी पोहोचते. मात्र, घटनेच्या दिवशी ती वेळेवर न आल्याने तिच्या आईने चालकाला फोन करून विचारणा केली. त्यानंतर सुमारे दीड तासाने चिमुकली घरी पोहोचली. घरी आल्यावर ती अत्यंत घाबरलेल्या आणि भेदरलेल्या अवस्थेत होती. आईने विश्वासात घेऊन विचारणा केली असता, नराधम चालकाने वाटेत तिच्या गुप्तांगाला स्पर्श करून तिचा छळ केल्याचे तिने सांगितले.

# स्मृती मंधानाच्या बालमित्राकडून पलाश मुच्छलवर ४० लाखांच्या फसवणुकीचा आरोप



**सांगली, ता. २३ :** बॉलिवूड मधील संगीतकार व दिग्दर्शक पलाश मुच्छल यांच्यावर आर्थिक फसवणुकीचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मंधानाचा बालमित्र असलेल्या विज्ञान माने यांनी पलाश मुच्छल यांच्याविरोधात ४० लाख रुपयांच्या फसवणुकीची तक्रार सांगली जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल केली आहे.

विज्ञान माने हे मराठी चित्रपटसृष्टीशी संबंधित असून त्यांनी काही चित्रपटांसाठी फायनान्सर म्हणून काम केल्याची माहिती आहे. माने आणि पलाश मुच्छल यांची ओळख स्मृती मंधानाच्या कुटुंबीयांमार्फत झाली होती. या ओळखीच्या माध्यमातून पलाश यांनी त्यांच्या आगामी नजरिया या चित्रपटासाठी गुंतवणुकीची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, चित्रपट पूर्ण होऊन ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाल्यानंतर गुंतवणूकदारांना रक्कम परत केली जाईल, असे आश्वासन पलाश यांनी दिले होते. मात्र, चित्रपटाचे काम पूर्ण झाले नाही आणि गुंतवलेली रक्कमही परत मिळाली नसल्याचा आरोप माने यांनी केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तसेच, सध्या पलाश यांच्याशी संपर्क साधता येत नसून, आपला मोबाईल क्रमांक ब्लॉक केल्याचा दावाही माने यांनी केला आहे.

या तक्रारीनंतर सांगली पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली असून प्रकरणाची सत्यता तपासली जात आहे. दरम्यान, पलाश मुच्छल किंवा त्यांच्या टीमकडून या आरोपांवर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.


या प्रकरणामुळे पलाश मुच्छल आणि स्मृती मंधाना यांच्यातील नातेसंबंधांबाबत पूर्वी झालेल्या चर्चांनाही पुन्हा उजाळा मिळाला आहे. दोघांच्या २०२५ मधील लग्नाच्या घोषणा नंतर रद्द झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्या वेळी दोघांनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून वेगळे होण्याचा निर्णय जाहीर केला होता. दरम्यान, आर्थिक फसवणुकीच्या या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सोसायटीच्या आवारात भरधाव कारने ५ वर्षांच्या मुलाला चिरडले

**पुणे, ता. २३ :** लोणी काळभोर परिसरात सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या ५ वर्षांच्या मुलाचा वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून सोसायटीतील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणी कार चालकाविरुद्ध लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत मुलाचे नाव निष्कर्ष अश्वत स्वामी असे आहे. तो लोणी काळभोर येथील जॉय नेस्ट सोसायटीमध्ये आपल्या कुटुंबासोबत राहत होता. निष्कर्षचे वडील अश्वत नारायण स्वामी यांनी या घटनेची तक्रार पोलिसांकडे दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, सोमवारी १९ जानेवारी रोजी दुपारी सुमारे ३:३० वाजताच्या सुमारास निष्कर्ष आपल्या आजीसोबत सोसायटीच्या आवारात आला होता. त्यानंतर तो स्केटिंग सायकलवर बसून खेळत होता. याच वेळी सोसायटीच्या आतून एक कार वेगात येत होती. चालकाने वेगावर नियंत्रण न ठेवल्याने कारची थेट निष्कर्षला धडक लागली. या अपघातात निष्कर्ष गंभीर जखमी झाला. घटनेनंतर लगेचच त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

या अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून ते सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे. या व्हिडिओमध्ये कारचा वेग स्पष्टपणे दिसत असून सोसायटीतून जाणाऱ्या वाहनांबाबत सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेनंतर कार चालक गाडीतून उतरून मुलाकडे धाव घेताना दिसतो, तसेच काही रहिवासीही घटनास्थळी जमा झाल्याचे दिसते.



## पुण्यात रुपाली पाटील-ठोंबरेंवर गुन्हा दाखल

### मतमोजणी केंद्राच्या जाळीवर चढून घातला होता राडा

**पुणे, ता. २३ :** महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान ईव्हीएम मशीन बदलल्याचा संशय व्यक्त करत हरकत घेतल्याप्रकरणी मोठा वाद निर्माण झाला असून, या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रुपाली पाटील ठोंबरे यांच्यासह काही उमेदवारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाल्याने हा प्रकार केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित न राहता निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेशी जोडला गेला आहे.

ही घटना १६ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता टिळक रोडवरील न्यू इंग्लिश स्कूलमधील मतमोजणी केंद्रात घडली. रुपाली पाटील ठोंबरे या प्रभाग क्रमांक २५ मधून राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढवत होत्या. मतदानाच्या दिवशी ज्या ईव्हीएम मशीनवर मतदान झाले, त्या मशीनचे क्रमांक निवडणूक प्रतिनिधींना देण्यात आले होते. मात्र मतमोजणीच्या दिवशी केंद्रात आणलेल्या काही ईव्हीएम मशीनचे क्रमांक हे प्रत्यक्ष मतदान झालेल्या मशीनच्या क्रमांकांशी जुळत नसल्याचा दावा उमेदवारांनी केला.

या संशयाच्या पार्श्वभूमीवर रुपाली पाटील ठोंबरे आणि इतर उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अधिकृत हरकत नोंदवली. या हरकतीची पोहोच द्यावी, अशी मागणी त्यांनी केली होती. मात्र पोहोच न मिळाल्याने आणि हरकतीकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करत त्यांनी संताप व्यक्त केला. याच दरम्यान रुपाली पाटील ठोंबरे यांनी मतमोजणी केंद्रात उभारलेल्या सुरक्षा जाळीवर चढून घोषणाबाजी केली. परिस्थिती तणावपूर्ण झाल्यानंतर संबंधित उमेदवारांनी मतमोजणीवर बहिष्कार टाकत केंद्र सोडले.

## शिरुर तालुक्यात नेत्यांचे वारसदार निवडणूक रिंगणात

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. २३ : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पाश्वभूमीवर शिरुर तालुक्याच्या राजकारणात वर्षानुवर्षे मिरासदारी गाजवणाऱ्या राजकीय मातब्बर पदाधिकाऱ्यांनी या निवडणुकीत आपल्या कुटुंबातील उच्चशिक्षित व युवा वारसदारांना निवडणूक रिंगणात उतरविले आहे.

यामध्ये माजी आमदार पोपटराव गावडे यांनी आपले उच्चशिक्षित पुत्र, शिरुर बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र गावडे यांना टाकळी हाजी - कवठे येमाई गटातून जिल्हा परिषदेसाठी ऐनवेळी भारतीय जनता पार्टीकडून निवडणूक रिंगणात उतरविले आहे. दिवंगत माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांच्या पत्नी मालती पाचर्णे ह्या भारतीय जनता पार्टीकडून शिरुर ग्रामीण - न्हावरे जिल्हा परिषद गटात आपले नशीब आजमावत आहे, तर माजी आमदार ॲड अशोक पवार यांनी पत्नी, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सुजाता पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुन्हा एकदा वडगाव रासाई - मांडवगण फराटा जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी दिली आहे.

बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार यांच्या पत्नी वंदना पवार ह्या शिरुर पंचायत समितीच्या निवडणुकीत पाबळ पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून आपले नशीब आजमावत आहे.तळेगाव ढमढेरे रांजणगाव सांडस या गटात जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल यांच्या पत्नी रेखा बांदल ह्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून आपले नशीब आजमावणार आहेत.

रांजणगाव गणपती - कारेगाव या जिल्हा परिषद गटात आंबेगाव शिरुर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर यांनी पत्नी ज्योती पाचुंदकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक रिंगणात उतरविले आहे. दिवंगत माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब खैरे यांच्या पत्नी कुसुम खैरे ह्या शिक्रापूर - सणसवाडी जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पार्टी कडून निवडणूक लढवत आहेत. डिंग्रजवाडीचे माजी सरपंच, उद्योजक राहुल गव्हाणे यांच्या पत्नी दीपाली गव्हाणे ह्या भारतीय जनता पार्टीकडून तळेगाव ढमढेरे - रांजणगाव सांडस या जिल्हा परिषद गटात आपले नशिब आजमावत आहेत.गव्हाणे ह्या वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्या कन्या आहेत.

## भारतामध्ये टी-२० वर्ल्ड कप खेळण्यास बांगलादेशचा नकार

**ढाका, ता. २३ :** बांगलादेश सरकारने भारतामध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत सहभागी होण्यास स्पष्ट नकार दिला आहे. आयसीसीकडून भारतातच सामने खेळण्याचा इशारा देण्यात आला असतानाही बांगलादेश आपल्या भूमिकेवर ठाम राहिला आहे. या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खळबळ उडाली असून, पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) याआधीच आपले सामने श्रीलंकेत खेळवावेत, अशी मागणी आयसीसीकडे केली होती. या मुद्द्यावर आयसीसी आणि बीसीबी यांच्यात चर्चा झाली होती. आयसीसीने बांगलादेशला २१ जानेवारीपर्यंत अंतिम निर्णय कळवण्याची मुदत दिली होती. मात्र, बांगलादेश सरकारच्या भूमिकेनुसार भारतात खेळण्यास नकार देण्यात आला आहे.

बीसीबीच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, भारतात टी-२० वर्ल्ड कप न खेळण्याचा निर्णय हा बांगलादेश सरकारचा असून क्रिकेट बोर्डाचा नाही. सुरक्षेचा मुद्दा पुढे करत सरकारने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे. बांगलादेशचे सामने श्रीलंकेतच व्हावेत, अशी भूमिका बीसीबीने कायम ठेवली आहे. मात्र, आयसीसीने ही मागणी फेटाळून लावली आहे.

दरम्यान, मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमधून वगळण्यात आल्याने हा विषय प्रतिष्ठेचा बनल्याचेही सांगितले जात आहे. कोलकाता नाईट रायडर्स संघात मुस्तफिजूरचा समावेश असल्याने सोशल मीडियावर केकेआरचा मालक शाहरुख खान यांना लक्ष्य करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने केकेआरला मुस्तफिजूरला संघातून वगळण्याचे निर्देश दिले होते, ज्याचे पालन करण्यात आले. यानंतरच बांगलादेशने भारतात टी-२० वर्ल्ड कप खेळण्यास नकार दिल्याची चर्चा आहे. भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे टी-२० वर्ल्ड कपचे आयोजन करणार असून, पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत खेळवण्यात येणार आहेत. बांगलादेशने आयसीसीकडे गट बदलण्याचीही मागणी केली होती, मात्र तीही नाकारण्यात आली.

बांगलादेशने स्पर्धेवर बहिष्कार टाकल्यास त्यांच्या जागी स्कॉटलंडला संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय या निर्णयाचा आर्थिक फटका बांगलादेश क्रिकेट बोर्डाला बसू शकतो. आयसीसीकडून मिळणारा सहभाग निधी गमावण्याबरोबरच, बीसीबीवर आर्थिक दंडही होऊ शकतो.

## दोन कोटींचा अमली पदार्थाचा साठा करणाऱ्या गॅरेज मालकाना अटक

**पुणे, ता. २३ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तहसीलमध्ये अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत पोलिसांनी एका ऑटोमोबाईल गॅरेज मालकाला अटक केली आहे. या कारवाईत सुमारे २ कोटी रुपये किमतीचे १ किलो मेफेड्रॉन (एमडी) हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई पुणे ग्रामीण पोलिसांनी केली असून या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी शिरूर तहसीलमधील बाबुराव नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. शादाब शेख (वय ४१) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो ऑटोमोबाईल गॅरेज चालवत असल्याची माहिती आहे. १७ जानेवारी रोजी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, एका गॅरेज मालकाकडे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ साठवून ठेवण्यात आले आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पथक तयार करून सापळा रचला.

पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून १ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले. हा पदार्थ कृत्रिम उत्तेजक औषध प्रकारातील असून त्याची बाजारातील किंमत सुमारे २ कोटी रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात आणखी काही व्यक्ती सहभागी आहेत का, तसेच हा साठा कुठून आणण्यात आला होता, याचा तपास सुरू आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या प्रकरणाबाबत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सांगितले की, १८ जानेवारीच्या रात्री पुणे ग्रामीण पोलिसांनी २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केले. शिरूरमधील गॅरेज मालकाकडून १ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले असून इतर दोन व्यक्तींकडून ९ किलो अमली पदार्थ सापडले असल्याचे त्यांनी नमूद केले.

पवार यांनी या प्रकरणात पोलिस कर्मचारी सहभागी असल्याचा संशय व्यक्त केला असून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांकडून या सर्व बाबींचा तपास सुरू असून पुढील कारवाई केली जाणार आहे.

# पुणे महापालिकेचा होणार महाविस्तार

## पुणे आणि खडकी छावणी परिषदांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू; मोहोळकर यांचा प्लॅन



**पुणे, ता. २३ :** पुणे आणि खडकी छावणी परिषद पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला असून केंद्र आणि राज्य पातळीवर याबाबत हालचाली सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बुधवारी (२१ जानेवारी) माध्यमांशी बोलताना मोहोळ म्हणाले, पुणे आणि खडकी छावणी परिषद क्षेत्रातील नागरिकांना पाणी, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य, स्वच्छता यासारख्या मूलभूत सुविधा महापालिकेच्या माध्यमातून अधिक सक्षमपणे देता याव्यात, यासाठी या दोन्ही छावणी परिषदांचा पुणे महानगरपालिकेत समावेश केला जात आहे. ही प्रक्रिया योग्य पद्धतीने पूर्ण होईल यावर लक्ष ठेवणे ही माझी जबाबदारी आहे. सध्या देशातील अनेक शहरांमध्ये छावणी परिषदांचा महापालिकांमध्ये समावेश केला जात असून पुणेही त्याच प्रक्रियेचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. या समावेशानंतर पुणे महापालिकेचा भौगोलिक विस्तार वाढणार असून जबाबदारीही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेचे विभाजन करण्यात येणार का, या प्रश्नावर मोहोळ यांनी स्पष्ट भूमिका मांडली. सध्या तरी पुणे महापालिकेचे विभाजन करण्याची गरज वाटत नाही. मुंबईत एवढे मोठे प्रशासन यशस्वीपणे हाताळले जाते, तर पुण्यातही ते शक्य आहे. भविष्यात गरज भासल्यास यावर विचार केला जाऊ शकतो, असे ते म्हणाले.

पुण्याच्या पाणीपुरवठ्याबाबत बोलताना मोहोळ यांनी झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणामुळे पाण्यावर ताण वाढत असल्याची कबुली दिली. पाणीचोरी आणि गळतीमुळे होणारे नुकसान लक्षात घेता मुळशी धरणातून पुण्यासाठी अतिरिक्त पाणीपुरवठ्याचा पर्यायही तपासला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीत पुणेकरांनी विकासासाठी भाजपला बहुमत दिले आहे. निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे ही आता आमची जबाबदारी आहे.

प्रलंबित पाणीपुरवठा प्रकल्प, नदी सुधारणा आणि सुशोभीकरणाला प्राधान्य दिले जाईल, असे मोहोळ यांनी स्पष्ट केले. छावणी परिषदांचा महापालिकेत समावेश झाल्यास लाखो नागरिकांना थेट महापालिकेच्या सुविधा मिळणार असून पुण्याच्या प्रशासकीय रचनेत मोठा बदल होणार आहे. त्यामुळे हा निर्णय केवळ प्रशासकीय नाही, तर पुण्याच्या भविष्यातील शहररचनेसाठीही महत्त्वाचा ठरणार आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

# शंकर बडेकर यांच्या गटाने भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे पक्षाकडून तिकीट : गणेश चौधरी

**लोणी काळभोर, ता. २३ :** उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात भारतीय जनता पक्षाने पूर्ण ताकतीने निवडणुकीत उतरण्याची तयारी केली असून, पक्ष सर्वसामान्य व निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. या गटात इच्छुक उमेदवार म्हणून जीवन शिंदे व शंकर बडेकर यांची नावे चर्चेत होती. मात्र, शंकर बडेकर यांच्या मोठ्या समर्थक गटाने भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे पक्षाने त्यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे त्यांचा विजय सुकर होईल, असा विश्वास भाजपचे हवेली तालुकाध्यक्ष गणेश चौधरी यांनी व्यक्त केला.



सोरतापवाडीउरुळी कांचन पंचायत समिती गणातून सुदर्शन चौधरी यांना भाजपची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सुदर्शन चौधरी हे गेल्या १० ते १५ वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय असून, पक्षाच्या माध्यमातून विविध विकासकामांत त्यांनी सहभाग घेतला आहे. सोरतापवाडीचे आदर्श सरपंच म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे.

उरुळी कांचन पंचायत समिती गणातून सारिका लोणारी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सारिका लोणारी या मागील १० वर्षांपासून भाजपमध्ये कार्यरत असून, उरुळी कांचन ग्रामपंचायतीत सलग तीन वेळा सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. महिलांसाठी पुढाकार घेऊन त्यांनी केलेल्या कामांची दखल घेत पक्षाने त्यांना उमेदवारी निश्चित केली आहे.

दरम्यान, सुरुवातीला भाजपकडून जीवन शिंदे यांना तिकीट देण्याचा विचार होता. मात्र, शंकर बडेकर यांच्या मोठ्या गटाच्या पक्षप्रवेशानंतर त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सोरतापवाडी गणातून सुदर्शन चौधरी यांना उमेदवारी जाहीर झाल्यामुळे पूजा सणस नाराज झाल्याची चर्चा आहे. मात्र, भाजप भविष्यात सर्वांना योग्य संधी देईल, त्यामुळे कोणीही नाराज होऊ नये, असे आवाहन गणेश चौधरी यांनी केले.

दरम्यान, उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातून शंकर बडेकर, सोरतापवाडी पंचायत समिती गणातून सुदर्शन चौधरी आणि उरुळी कांचन पंचायत समिती गणातून सारिका लोणारी हे भाजपचे अधिकृत उमेदवार असून, या तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन गणेश चौधरी यांनी मतदारांना केले आहे.

# वाहतूक पोलिसांकडून रस्ता सुरक्षा अभियान; विद्यार्थ्यांच्या रॅलीतून नियमांची जनजागृती

**उरुळीकांचन, ता. २३ :** वाढते रस्ते अपघात रोखणे आणि सुरक्षित प्रवासाचा संदेश पोहोचवण्यासाठी उरुळी कांचन पोलीसांच्या वाहतूक विभागाकडून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान २०२६अंतर्गत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

शुक्रवारी (ता. २३) सकाळी पोलिस विभागामार्फत कॉलेज, रिक्षा स्टँड, बस, रेल्वे स्थानक, यांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबवविण्यात सुरुवात झाली. महात्मा गांधी विद्यालय येथे विशेष जनजागृती कार्यक्रमाचे




आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियम ांबाबत लहान फ्लेक्स तयार करून रॅली काढली.

रॅलीदरम्यान हेल्मेट घालणारे व सीट बेल्ट लावणारे वाहनचालक यांना विद्यार्थ्यांच्या हस्ते गुलाबाचे पुष्प देऊन प्रोत्साहन देण्यात आले. याचवेळी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम, सुरक्षित वाहनचालकाचे महत्त्व तसेच रस्ता अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. रस्ता अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

सदर रॅलीच्या अनुषंगाने महात्मा गांधी शाळेतील शिक्षक राजेंद्र बोधे, उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील सहायक फौजदार रमेश भोसले, सुनील सस्ते, पोलीस हवालदार सचिन जगताप, सुनील वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल खांडेकर, धनंजय भोसले, मनोज रत्नपारखी आदि कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, या रॅलीच्या अनुषंगाने महात्मा गांधी शाळेतील शिक्षक राजेंद्र बोधे, उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील सहायक फौजदार रमेश भोसले, सुनील सस्ते, पोलीस हवालदार सचिन जगताप, सुनील वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल खांडेकर, धनंजय भोसले, मनोज रत्नपारखी आदी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याबाबत बोलताना सहायक फौजदार रमेश भोसले म्हणाले, या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृती निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांच्या सहभागातून दिलेला संदेश प्रभावी ठरेल.

# स्वातंत्र्य कुणी देत नाही, ते मिळवावे लागते : प्रा. गणेश हजारे

**लोणी काळभोर, ता. २३ :** केवळ अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळणे कठीण आहे, हे ओळखून नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग निवडला. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर सातासमुद्रापार जाऊन जर्मनी आणि जपान या देशांना मदतीचा हात मागितला.स्वातंत्र्य कुणी देत नाही, ते मिळवावे लागते. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. असे प्रतिपादन प्रा. गणेश हजारे यांनी केले.




लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२९ वी जयंती निमित्त व्याख्यान देताना वरील प्रतिपादन प्रा. गणेश हजारे यांनी केले. पुढे बोलताना प्रा. गणेश हजारे म्हणाले की, तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा! अशी गर्जना करून भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला पेटवणारे थोर क्रांतीकारक नेताजी सुभाषचंद्र बोस यांना माझा मानाचा मुजरा. नेताजींचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशामधील कटक येथे झाला. ते लहानपणापासूनच अत्यंत हुशार होते. त्यांनी आय. सी.एस. सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण केली, पण देशसेवेसाठी त्यांनी इंग्रजांची गुलामी नाकारली आणि स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली.

दरम्यान, चलो दिल्ली आणि जय हिंद या घोषणांनी त्यांनी संपूर्ण देशाला एकत्र आणले. त्यांनी 'आझाद हिंद फौज' स्थापन करून ब्रिटीश सत्तेला हादरा दिला. त्यांचे धाडस आणि अजोड देशभक्ती आजही आपल्याला प्रेरणा देते. त्यांच्या विचारांवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. असे हजारे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर म्हणाले की, आज नेताजी आपल्यात नसले, तरी त्यांचे 'जय हिंद' हे शब्द आजही आपल्या नसानसात राष्ट्रप्रेम भरतात. शिस्त, त्याग आणि प्रखर राष्ट्रवाद हे त्यांचे गुण आजही प्रत्येक तरुणासाठी आदर्श आहेत. भारताला महासत्ता बनवण्यासाठी नेताजींसारखी जिद्द आणि आत्मविश्वास आपल्यात असणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन केले. प्रा. सतीश कुद्ळे यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा जन्मदिवस भारत सरकारने २०११ पासून पराक्रम दिवस म्हणून घोषित केले आहे. हे सांगून त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून इतिहास विभागाने नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवन कार्यावर भितीपत्रिका बनवल्या आहेत. प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहा हिंगमिरे यांनी केले तर आभार डॉ. स्नेहा बुरगुल यांनी मानले.

# महसूल विभागाच्या 'भोंगळ' कारभाराविरुद्ध जमाबंदी आयुक्त कार्यालय येथे २६ जानेवारीला जनआंदोलन

**पुणे, ता. २३ :** शेतकरी व नागरिकांच्या जमिनीशी संबंधित व्यवहारांचा कणा मानला जाणारा महसूल व भूमी अभिलेख विभाग सध्या तीव्र टीकेच्या केंद्रस्थानी आला आहे. ब्रिटिश काळापासून प्रशासनाचा महत्त्वाचा आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या या विभागावर अकार्यक्षमता, दिरंगाई आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप होत असून, नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे.

जमिनीच्या नोंदी, मोजणी, फेरफार, दस्तऐवज तपासणी, अर्धन्यायिक प्रकरणे तसेच सेवा हमी कायद्यानुसार नागरिकांना वेळेत सेवा देणे ही या विभागाची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

गेल्या काही वर्षांत नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांमुळे जमिनींच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यातून शासनाच्या तिजोरीत मोठा महसूल जमा होत असताना, त्याच वेळी या विभागातील लाचखोरीबाबतच्या तक्रारींमध्येही वाढ झाल्याचे आरोप होत आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत महसूल व भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग वारंवार समोर येत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे.

पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील नागरिकांच्या अनुभवातून सेवा हमी कायद्यानुसार ठरलेल्या कालावधीत सेवा न मिळणे, मोजणीसाठी वारंवार हेलपाटे घालावे लागणे, चुकीच्या मोजण्या दाखवणे, नकाशे व कागदपत्रांतील त्रुटी, नियम व परिपत्रकांकडे दुर्लक्ष, तसेच आर्थिक फायद्यासाठी निर्णय घेतल्याचे आरोप समोर येत आहेत. या कथित भोंगळ कारभारामुळे नागरिकांना विनाकारण वेठीस धरले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या कार्यपद्धतीविरोधात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या जानेवारी रोजी पुण्यात जनआंदोलन छेडण्यात येणार आहे. प्रजासत्ताक दिनी सकाळी . वाजता जमाबंदी आयुक्त कार्यालय येथे हे आंदोलन होणार असून, कामकाजात पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांच्या तक्रारींची प्रभावी दखल घेण्याच्या मागण्या करण्यात येणार आहेत.

महसूल विभागाच्या कारभारामुळे त्रस्त शेतकरी, भूधारक व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या हक्कांसाठी या जनआंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक समितीने केले आहे. हे आंदोलन प्रशासनाला जाब विचारण्याचा आणि व्यवस्थेतील त्रुटींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## व्यायामाचा कंटाळा पडू शकतो महाग; शरीरात होतात 'हे' ७ भयंकर बदल

पुणे, ता. २३ : आजच्या डिजिटल युगात 'स्मार्टफोन' आणि 'लॅपटॉप' समोर बराच वेळ बसून राहण्याच्या सवयीने आपल्या शरीराची हालचाल कमी होते. ताजी आकडेवारी धक्कादायक असून भारतातील जवळपास ५० टक्के लोक शारीरिकदृष्ट्या 'अनफिट' आहेत. पण तुम्हाला माहीत आहे का, की जेव्हा तुम्ही सलग काही दिवस व्यायाम टाळता, तेव्हा तुमच्या शरीरात नेमकं काय घडतं? हे केवळ वजन वाढण्यापुरतं मर्यादित नाही, तर अनेक बदल होतात.

हृदयाची कार्यक्षमता घटते : व्यायाम न केल्याने हृदयाचे स्नायू कमकुवत होतात. हृदय रक्त पंप करण्यासाठी जास्त जोर लावते, ज्यामुळे उच्च रक्तदाब आणि पर्यायाने हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका ४० टक्क्यांनी वाढतो.

चयापचय संस्था मंदावते : जेव्हा तुम्ही व्यायाम करत नाही, तेव्हा शरीरातील 'कॅलरी बर्न' करण्याची क्षमता मंदावते. यामुळे रक्तातील साखर वाढत जाते, ज्यामुळे टाइप २ मधुमेहहोण्याची शक्यता बळावते. अगदी थोड्याशा खाण्यानेही वजन वेगाने वाढू लागते.

स्नायू आकुंचन पावतात : स्नायूंचा वापर न केल्यास ते आकुंचन पावू लागतात. वयानुसार होणारी स्नायूंची झीज वेगाने होते. यामुळे सांधेदुखी, कंबरदुखी आणि हाडांचे आजार तरुण वयातच डोकेवर काढतात.

मानसिक आरोग्य : व्यायाम केवळ शरीरासाठी नाही तर मनासाठीही 'डिटॉक्स' आहे. शारीरिक हालचाल न केल्याने शरीरात 'डोपामाइन' आणि 'सेरोटोनिन' कमी होतात. परिणामी, चिंता, नैराश्य आणि सततचा थकवा जाणवू लागतो.

तज्ज्ञांचा सल्ला: काय करावे? : १५० मिनिटांचा नियम: आठवड्यातून किमान १५० मिनिटे मध्यम स्वरूपाचा व्यायाम करा.

ब्रेक घ्या : बसून काम करत असाल, तर दर ४५ मिनिटांनी ५ मिनिटे चाला.

घरगुती व्यायाम: जिम शक्य नसेल तर सूर्यनमस्कार, योगासने किंवा जिने चढणे-उतरणे हे पर्याय निवडा.

# कोरेगाव मूळ येथील अपघातात एकाचा मृत्यू; तर तिघे जण जखमी

## पुणे-सोलापूर महामार्गावर स्कोर्पिओ गाडी झाडाला धडकली



उरुळी कांचन, (पुणे), ता. २३ : पुणे-सोलापूर महामार्गावर स्कोर्पिओ चालकाचे नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर तिघेजण जखमी झाले आहेत. कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनाम दार वस्ती परिसरात आज शुक्रवारी (ता. २३) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. हा अपघात एवढा भीषण होता की यामध्ये चारचाकी स्कोर्पिओचा चकनाचूर झाला आहे.

गोरख त्र्यंबक माने (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर समाधान अंकुश बाबर (वय २५, धंदा केळी व्यवसाय, रा. कुगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर), विजय सूर्यकांत माने व अलिकेश खान असे अपघातात जखमी झालेल्या तिघांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, समाधान बाबर यांचे मामा विजय माने, चुलत मामा गोरख माने व त्यांचे मित्र अलिकेश खान असे चौघेजण मुंबई येथे केळी एक्सपोर्ट संदर्भातील मीटिंगसाठी गेले होते. त्यानंतर गुरुवारी संध्याकाळी मुंबई येथून रात्री करमाळ्याकडे निघाले होते.

हडपसर पुणे येथे सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आले नंतर विजय माने हे स्कार्पिओ चालवण्यास बसले होते. तर त्यांच्या शेजारील सीटवर गोरख माने हे बसले होते. तर पाठीमागील सीटवर समाधान बाबर व अलिकेश खान हे बसले होते.

उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रयागधाम फाटा व कोरेगाव मूळ जवळ आले असता विजय माने यांचे स्कोर्पिओवरील नियंत्रण सुटले व स्कार्पिओ कार ही हायवे रोडच्या डाव्या बाजूने खाली जाऊन झाडास धडकून अपघात झाला. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले तर गोरख माने यांच्या डोक्याला व हातापायाला गंभीर दुखापत झाली.


सदर घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार उद्धव गायकवाड, हरिष शितोळे, अमोल राऊत, बाळू चोरमले घटनास्थळी दाखल झाले. तसेच सर्व जखमींना कस्तुरी रुग्णवाहिकेचे माऊली लाड, संतोष झोंबाडे, रतन चव्हाण यांनी नागरिकांच्या मदतीने उरुळी कांचन येथील सिद्धीविनायक रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, उपचारादरम्यान गौरख माने यांचा मृत्यू झाला तर तिघांवर उपचार सुरु आहेत. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार उरुळी कांचन पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

## २.६५ लाखांचा सायबर फसवणूक प्रकार उघडकीस

पुणे, ता. २३ : लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकरणात जलद कारवाई करत २.६५ लाखांची संपूर्ण रक्कम परत मिळवून तक्रारदाराला दिली आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये महादेव महारुद्र कचरे (वय ५७, रा. लोणी काळभोर) यांना अज्ञात सायबर चोरट्यांनी कर्ज देण्याच्या बहाण्याने संपर्क साधला. आरोपींनी स्वतःला नामांकित फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवत विश्वास संपादन केला. कर्ज प्रक्रिया, शुल्क व इतर कारणे सांगून वेळोवेळी तक्रारदाराकडून ऑनलाईन स्वरूपात एकूण २,६५,००० रुपये उकळण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर सायबर पथकाने तांत्रिक विश्लेषण करत बँक व्यवहारांचा मागोवा घेतला व संबंधित बँक व आर्थिक संस्थांशी समन्वय साधत फसवणुकीची संपूर्ण रक्कम जप्त करून ती तक्रारदारास परत करण्यात आली आहे.

# भररस्त्यात राजाराम बापूंच्या प्रतिमेवर टाचण्या, लिंबू आणि काळं फासल



सांगली, ता. २३ : सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची धामधूम सुरू असतानाच राजकारणाला काळी छाया फासणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार जयंत पाटील यांचे वडील स्वर्गीय राजाराम बापू पाटील यांच्या प्रतिमेवर जादूटोणा करण्यात आल्याचा प्रकार वाळवा तालुक्यातील येलूर गावात उघडकीस आला आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि पदाधिकारी आक्रमक झाले आहेत.

येलूर येथे रस्त्याच्या कडेला स्व. राजाराम बापू पाटील यांच्या फोटोचा पोस्टर लावण्यात आला होता. या पोस्टरवर काळा रंग फासण्यात आला असून त्यावर टाचण्या टोचलेल्या होत्या. त्याचबरोबर लिंबू, केळी टाकून उतारा केल्यासारखा प्रकार करण्यात आला होता. हा फोटो मुद्दाम रस्त्याच्या कडेला टाकून देण्यात आल्याचे दिसून आले आहे. ही घटना समोर येताच संपूर्ण वाळवा तालुक्यात खळबळ उडाली आहे. स्व. राजाराम बापू पाटील हे सांगली जिल्ह्यातील आदराचे नेतृत्व मानले जाते. सहकार, समाजकारण आणि राजकारणात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अशा नेत्याच्या प्रतिमेवर अशा प्रकारे जादूटोणा करणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा अपमान नाही, तर संपूर्ण राजकीय संस्कृतीवर काळा डाग असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

नुकतेच भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर टीका करताना स्व. राजाराम बापू पाटील यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यावरून जिल्ह्यात मोठा वाद निर्माण झाला होता. त्यातच आता हा प्रकार समोर आल्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारण अधिक तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या घटनेचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संबंधितांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवडणुकीच्या काळात अशा प्रकारचे घाणेरडे राजकारण थांबवावे, अन्यथा जनतेत चुकीचा संदेश जातो, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## पित्ताचा त्रास दूर करण्यासाठी महिलेवर अघोरी कृत्य

पुणे, ता. २३ : शिक्षणाचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुण्यात अंधश्रद्धेचे धक्कादायक प्रकार आजही थांबलेले नाहीत, याचं पुन्हा एकदा विदारक दर्शन घडलं आहे. एका महिलेला होणारा पित्ताचा त्रास बरा करण्याच्या नावाखाली अघोरी आणि अंधश्रद्धेने भरलेले प्रयोग केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकाराविरोधात चंदननगर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदाराने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, हा व्हिडिओ पुण्यातील वडगाव शेरी परिसरातील आहे. व्हिडिओमध्ये एक महिला खुर्चीवर बसलेली दिसते. तिच्या भोवती तिघेजण उभे असून समोर फळ्यावर काही वाक्ये लिहिलेली आहेत. ती वाक्ये मोठ्याने वाचत हे तिघेही महिलेभोवती मंत्र पुटपुटत असल्याचे स्पष्टपणे दिसते. या तथाकथित मंत्रांच्या जोरावर पित्त उतरवतो, आजारीपण दूर करतो असा दावा केला जात आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, हा प्रकार केवळ अंधश्रद्धेला खतपाणी घालणारा नाही, तर महिलांच्या आरोग्याशी थेट खेळ करणारा आहे. कोणताही वैद्यकीय आधार नसताना आजार बरा करण्याचे दावे करून लोकांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हा व्हिडिओ महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याने, पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा समोर आला आहे. डॉक्टर, रुग्णालये आणि आधुनिक उपचार सहज उपलब्ध असतानाही लोक अशा अघोरी प्रकारांना का बळी पडतात?



## ठाकरेंची युती तुटणार?; बाळासाहेबांच्या जयंतीदिनीच दिले मोठे संकेत

मुंबई, ता. २३ : राज्याच्या राजकारणात सध्या 'कल्याण पॅटर्न'ची चर्चा रंगली असतानाच, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टने भावी समीकरणांचे संकेत दिले आहेत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त लिहिलेल्या पोस्टमध्ये राज यांनी राजकारणात लवचिक भूमिका घेतली तरी ती स्वार्थासाठी नसेल, असे विधान केल्याने मनसे आता मुंबईतही उद्धव ठाकरेंची साथ सोडून महायुतीला (भाजप-शिंदे गट) पाठिंबा देणार का? या चर्चेला उधाण आले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही भाऊ अनेक वर्षांनंतर एकत्र लढले. 'मराठी अस्मिता' आणि 'ठाकरे ब्रँड'च्या नावावर मतदारांना साद घालण्यात आली, परंतु निकालाने धक्का दिला. सत्ता काबीज करण्यात दोन्ही बंधूंना अपयश आले आणि मनसेचे अवघे नगरसेवक निवडून आले. या निकालाने राज ठाकरेंना आपल्या राजकीय भूमिकेचा फेरविचार करण्यास भाग पाडल्याचे दिसत आहे.

कल्याण- डोंबिवली महापालिकेत मनसेने शिंदे गटाला पाठिंबा देऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. आता तीच पुनरावृत्ती मुंबईत होण्याची दाट शक्यता आहे. राज ठाकरे यांनी आपल्या पोस्ट मध्ये यासंदर्भात महत्वाचे संकेत दिले आहेत. बाळासाहेबांनीही समाजहितासाठी वेळप्रसंगी भूमिका बदलली होती, तसेच मीही कधी 'लवचिक' झालो तर तो माझा व्यक्तिगत स्वार्थ नसेल, असे राज यांनी स्पष्ट केले आहे. राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये आजच्या राजकारणावर खरमरीत टीका केली आहे. आज निष्ठा सहज विकल्या जातात आणि राजकारण पूर्ण व्यवहारी झाले आहे, असे म्हणत त्यांनी जळजळीत टिका केली आहे. बाळासाहेबांच्या प्रतिभेला धक्का लागू न देता मराठी माणसाचा लढा धगधगत ठेवण्याचा शब्द त्यांनी दिला आहे.

# सुळेंचा 'एकहाती' किल्ला लढवणारे आप्पासाहेब पवार भाजपमध्ये

संदिप टूले



दौंड, ता. २३ : जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर अनेक राजकीय घडामोड घडायला सुरूवात झाली आहे. दौंड तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठी धक्का बसला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श. पा गटाचे) तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार भाजप पक्षातून खडकी देऊळगाव गटातून आपला उमेदवारी अर्ज दाखल करत सर्वांनाच धक्का दिला होता तर आज दिनांक रोजी त्यांनी भाजपा मध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

या प्रवेशाने दौंड च्या पूर्व भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठे खिंडार पडले असून आमदार राहुल कुल यांनी राजकीय खेळी करत मोठा नेता गळला लावला आहे. गेली कित्येक वर्ष आप्पासाहेब पवार यांनी तालुकाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये काम केले असून राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर त्यांनी शरद पवार गटामध्ये राहून लोकसभेवेळी खासदार सुप्रिया सुळे यांचा दौंड मध्ये एकहाती किल्ला लढवत दौंड चे दोन्ही आजी माजी आमदार विरोधी गटात असतानाही मोठे मताधिक्य मिळवून दिले होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये त्यांनी त्यांना मानणारा मोठा वर्ग निर्माण केला आहे. या घडामोडीमुळे शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील गटात अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे. दौंड तालुक्यातील अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, काही जण भाजपकडे झुकण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसरीकडे भाजप कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण आहे. आप्पासाहेब पवार यांच्या भाजप प्रवेशामुळे आगामी निवडणुकांमध्ये याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे आमदार राहुल कुल यांनी खडकी देऊळगाव राजे गटातून आप्पासाहेब पवार यांना ऐनवेळी उमेदवारी देत मोठा डाव टाकला.

# गुटखा विक्रेत्यांवर आता लागणार 'मकोका'; महाराष्ट्रात येणार कायदा

पुणे, ता. २३ : महाराष्ट्रात गुटखा आणि तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर पूर्णतः बंदी घालण्यासाठी आता स्वतंत्र आणि अधिक कठोर कायदा करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये लागू असलेल्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर गुटखाबंदीचा स्वतंत्र कायदा तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले आहेत. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा कायदा विधिमंडळात मांडण्यात येणार असल्याचे स्पष्ट संकेत त्यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत या कायद्याच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे पाटील, गृह, विधी व न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच पोलीस महासंचालक स्तरावरील अधिकारी उपस्थित होते.

राज्यात सध्या गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूसारख्या पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्रीवर बंदी आहे. मात्र तरीही अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असून तरुण पिढी त्याच्या आहारी जात असल्याचे चित्र आहे. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात सर्रासपणे गुटखा विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्या मुळे सरकारने आता अधिक कठोर भूमिका घेतली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनातच अन्न व औषध प्रशासन आणि गृह विभागाच्या संयुक्त पथकाची स्थापना करण्याची घोषणा केली होती. यासोबतच गुटखा विक्रेत्यांवर मकोकासारखा कठोर कायदा लावण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. आता या प्रस्तावाला प्रत्यक्षात आणण्यासाठी कायद्यात आवश्यक दुरुस्त्या करून गुटखा तस्करी, साठेबाजी आणि विक्रीचे गुन्हे मकोकाच्या कक्षेत आणले जाणार आहेत.

राज्यात आतापर्यंत हजारो कोटींच्या गुटख्याच्या अवैध साठ्यावर कारवाई करण्यात आली असून अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. तरीही हा व्यवसाय मोडीत काढण्यासाठी स्वतंत्र कायद्याची गरज असल्याचे सरकारचे मत आहे. हा कायदा लागू झाल्यास गुटखा विक्रेत्यांना केवळ दंड किंवा शिक्षा नव्हे, तर संघटित गुन्हेगारी प्रमाणे कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

# दौंडमध्ये रोडरोलरखाली चिरडून चार वर्षाच्या बालकाचा मृत्यू




दौंड, ता. २३ : दौंड शहरातील जनता कॉलनी परिसरात बुधवारी दुपारी घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण शहर हादरून गेलं. रस्त्याच्या डांबरीकरणाचं काम सुरू असताना रोडरोलरखाली चिरडून चार वर्षांच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. आर्यन संतोष जाधव असं या बालकाचं नाव असून तो आपल्या आई-वडिलांसोबत अंबालिका कारखाना परिसरात राहत होता.


शिवालय अपार्टमेंटसमोरील वर्दळीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने डांबरीकरणाचं काम सुरू होतं. काम सुरू असताना परिसरात कोणतीही सुरक्षा व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. ना फलक, ना बॅरिकेड्स, ना वाहतूक नियंत्रण. रस्त्यावर नागरिकांची ये-जा सुरू असतानाच रोडरोलर भरधाव वेगात चालवला जात होता. स्थानिक रहिवाशांनी चालकाला वारंवार वेग कमी करण्याची सूचना केली होती. मात्र काम लवकर उरकायचं या नादात चालकाने दुर्लक्ष केलं आणि त्यामुळेच ही दुर्घटना घडली.

आर्यन हा आपल्या आई-वडिलांसोबतच कामाच्या ठिकाणी होता. आई-वडील डांबरीकरणाच्या कामावर मजूर म्हणून काम करत असताना आर्यन आसपास खेळत होता. काही क्षणांतच तो रोडरोलरच्या खाली आला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेला.

या घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. शहरात अनेक ठिकाणी कोणतीही सुरक्षा उपाययोजना न करता रस्त्यांची कामं सुरू असल्याचं वास्तव या दुर्घटनेतून पुन्हा समोर आलं आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षारक्षक, सूचना फलक, बॅरिकेड्स आणि वेगमर्यादा असणं अनिवार्य असताना त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं जात आहे.

# जुन्नरमध्ये बिबट्यांची दहशत संपता संपेना; कोपरे गावात आणखी एक बिबट्या गजाआड

## वनविभागाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली



पुणे, ता. २३ : जुन्नर तालुक्यातील कोपरे गाव आणि परिसरात गेल्या काही आठवड्यांपासून बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण होतं. रात्री-अपरात्री शेतात जाणं, जनावरं चारायला नेणं किंवा लहान मुलांना बाहेर सोडणंही धोकादायक बनलं होतं. काही ठिकाणी बिबट्याचे ठसे आढळले, तर काही शेतकऱ्यांना जनावरांवर हल्ल्याचा अनुभवही आला होता. त्यामुळे ग्रामस्थांनी वारंवार वनविभागाकडे तक्रार करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने कोपरे गावठाण हद्दीत पिंजरा लावण्याचा निर्णय घेतला.

अखेर बुधवार, २१ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजता या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याने गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत सुरक्षितपणे बिबट्याला ताब्यात घेतलं.

प्राथमिक तपासणीत हा बिबट मादी असून तिचं वय अंदाजे ४ वर्षे असल्याचं समोर आलं आहे. पुढील उपचार आणि निरीक्षणासाठी तिला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलवण्यात आलं आहे. तिची प्रकृती सध्या स्थिर असून वनतज्ज्ञ तिच्यावर लक्ष ठेवून आहेत.

विशेष म्हणजे गेल्या २७ दिवसांत याच परिसरातून चार बिबट्यांना जेरबंद करण्यात वनविभागाला यश आलं आहे. यावरून जुन्नर परिसरात मानवी वस्ती आणि जंगल यांची सरमिसळ किती वाढली आहे, हे स्पष्ट होतं. शेती, ऊसतोड, पाणी शोधत येणारी जनावरं आणि जंगलातील अधिवास कमी होत चालल्याने बिबटे गावांच्या जवळ येण्याचं प्रमाण वाढत आहे.

बिबट्या जेरबंद झाल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला असला तरी सतर्क राहणं गरजेचं आहे.

रात्री एकटे बाहेर न जाणं, जनावरांना बंदिस्त जागेत ठेवणं आणि बिबट्याचा वावर दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवणं, या साध्या पण महत्त्वाच्या खबरदारी नागरिकांनी घ्याव्यात, असं आवाहन वनविभागाकडून करण्यात आलं आहे.